Players Participate in Pro – Kabaddi Leg Tournament India

Gadai Shankar Bimraj

Khatik Rahul Babasaheb

Dhanwade Rahul Gorakh

1) Yoga Day (Boys & girls) 21 June 2022

2) Cycle Really (Boys & girls) 9 June 2022

3) Krida Din Sport Day 29 /08/2022

4) Inter Collegiate Kabaddi (Women) 8 October 2022

5) Ahmednagar District Kabaddi Men Open Tournament & District selection Trial 11 December 2022

6)

Maharashtra State Kabaddi Camp Men & State Kabaddi Team Selection1 June To 15 June 2022

7) Orthopedic Camp & Sports injury Lecture

8) World Women Day organized Sports 8 March 2023





9) Open Cricket Tournament

10) Guidance Lecture for Police Recruitment 2023

दिव्य मराठी
अहमदनगर 10-03-2022

जिजामाता महाविद्यालयाच्या कबड्डी खेळाडूंचे यश कौतुकास्पद : अभंग

खेळाडुंच्या सत्कारप्रसंगी माजी आमदार पांडुरंग अभंग यांच्यासह मान्यवर.

प्रतिनिधी | नेवासे

राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेमध्ये पहिल्यांदाच अहमदनगर संघ अजिंक्य ठरलेल्या विजयामध्ये कप्तानासह जिजामाता महाविद्यालयाच्या चार खेळाडूंचा सहभाग होता. खेळाडूंचे हे यश कौतुकास्पद आणि भविष्यातील खेळाडूंना प्रेरणादायी ठरेल, असे गौरवोद्गार माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी काढले. ते जिजामाता महाविद्यालयात आयोजित सत्कार समारंभात बोलत होते.

भिवंडी येथे झालेल्या ६९ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत नगरच्या पुरुष संघाने १९९९ नंतर प्रथमच श्रीकृष्ण करंडकावर नगर जिल्ह्याचे नाव कोरले. या यशामध्ये चार विद्यार्थी हे भेंडे येथील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाचे आणि एक विद्यार्थी हा दहिगाव येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाचा आहेत. जिल्ह्याच्या विजयी संघातील महाविद्यालयातील खेळाडू गदई शंकर भीमराज (कप्तान), राम बाबासाहेब आढागळे, राहुल गोरख धनवडे, राहुल बाबासाहेब खाटिक यांचा तसेच प्रशिक्षक सतीश मोरकर, शिवाजी वावळे, परशुराम नाकडे, राजेंद्र वायकर, प्रा. दत्ता वाकचौरे, रघुनाथ मोरकर यांचा सत्कार करण्यात आला.

ग्रामीण जनतेचा आवाज

जल भूमी

संस्थापक संपादक : शिवम बाळासाहेब जाधव

www. jalbhumi.com jalbhuminews@gmail.com 9834967767

कष्ट व आत्मविश्वासानेच यशाची प्राप्ती होते – डॉ. नरेंद्र घुले

राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेतील विजयी संघातील खेळाडूंचा सत्कार

जलभूमी वृत्तसेवा

भेंडा : ग्रामीण भागातील खेळाडूंनी कष्टाने व आत्मविश्वासाने खेळ करत वरा मिळविले . खेळाडूंची ही कामगिरी निश्चितच अभिमानास्पद आहे . ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या अशा खेळाडूंचा चौकाचौकात सन्मान सोहळा झाला पाहिजे . त्यामुळे नवीन युवा खेळाडूमध्ये उत्साह व नवचैतन्य निर्माण होऊन त्यांना प्रेरणा मिळते .आगामी काळात भेंडा येथे महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कबड्डी संकुलासाठी पाठपुरावा करून होतकरू खेळाडूंना खेळाच्या सर्व सुविधा पुरवण्यात येतील अशी ग्वाही लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सह साखर कारखाना अध्यक्ष माजी आमदार डॉ.नरेंद्र घुले यांनी यावेळी दिली. भिवंडी येथील ६९ व्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत अहमदनगर संघाने ऐतिहासिक विजय मिळविला. त्यात भेंडा येथील एकमेव स्पोर्टसचे व जिजामाता महाविद्यालयातील चार खेळाडू तसेच दहिगाव ने लोकनेते घुले पाटील महाविद्यालयामधील दोन खेळाडूचा सहभाग होता या विजयी संघाचा जाहीर सत्कार दि .६ रोजी (रविवार) भेंडा येथे आयोजित करण्यात आला होता या प्रसंगी अध्यक्षस्थानी माजी आमदार नरेंद्र घुले होते. राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा जिजामाता महाविद्यालय भेंडा येथे आयोजित करण्यात आल्या होत्या . सराव शिबीराच्या वेळी खेळाडूंना निवास व्यवस्था व सोयी सुविधा जिजामाता महाविद्यालयाने उपलब्ध करून दिली होती तसेच राज्य अजिंक्यपद कबड्डी विजयानंतर महाविद्यालयाच्या वतीने संघातील खेळाडूंना ट्रॅक सूट देण्यात आले होते .या उपक्रमाचे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले. यावेळी प्रा.सुनिल जाधव, परशुराम नाकाडे,त्रिमुर्ती संकुलाचे प्राचार्य सोपान काळे,महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाचे उपाध्यक्ष प्रा.शशिकांत गाडे , संजय फडके यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.व्यासपीठावर माजी आमदार डॉ.नरेंद्र घुले , माजी आ.पांडुरंग अभंग ,सभापती डॉ. क्षितीज घुले , प्रा शशिकांत गाडे,डॉ. शिवाजीराव शिंदे, संजय फडके, काशिनाथ नवले , गणेशराव गव्हाणे , कार्यकारी संचालक अनिलराव शेवाळे, रविंद्र मोटे ,संचालक अशोकराव मिसाळ, तुकाराम मिसाळ,नामदेवराव विक्रम,भेंडा खु सरपंच सुनिल खरात,उपसरपंच रविंद्र नवले, सोमनाथ कचरे, प्राचार्य रामकिसन सासवडे,प्रा.दत्ता वाकचौरे,विजय मिस्किन, सुभाष कडु,पो.कॉ.बंडू भागवत,अँड. रविंद्र गव्हाणे, पत्रकार नामदेव शिंदे, ईम्माईल शेख, संतोष औताडे, किशोर थोरे आदिसह क्रीडाप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते .कार्यक्रमाचे प्रास्ताविक रणवीर स्पोर्टस् क्लबचे अध्यक्ष सोपान महापूर यांनी केले तर सूत्रसंचालन अशोक पंढीत यांनी केले आभार प्रशांत लवडे यांनी मानले.

खेळाडूंना पाठबळ देणार–

युवकांना खेळाची गोडी लागली की आपोआप सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन सुदृढ पिढी तयार होते . खेळाडू विविध क्षेत्रात आपल्या कार्याची ओळख देतील खेळाडूंना पाठबळ देण्यात येऊन त्यांना आवश्यक ते सहकार्य केले जाईल . वापूचीही खेळाडूंना स्व. लोकनेते मारुतराव घुले पाटील यांनी जिजामाता विद्यालय ते महाविद्यालयाच्या माध्यमातून संस्थेने सुविधा पुरविल्या आहेत. तसेच वापुढे सर्व सहकार्य केले जाईल . आज हे खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेत चमकदार कामगिरी करत आहेत वापुढेही निश्चितच आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उंचावतील .

डॉ. क्षितिज घुले – सभापती , पं. स. शेवगाव.

विजयी संघातील खेळाडू

विजयी संघात कर्णधार शंकर गदाई, राहुल खाटीक, राहुल धनवडे ,राम अहागळे,देविदास जगताप, अजिंक्य जिवराक,अजित पवार, संभाजी चाबळे, आदित्य शिंदे, प्रेम खुरांगे, राहुल आगळे ,प्रफुल्ल झावरे, सतिश मोरकर, रघू मोरकर ,टीम मॅनेजर प्रशिक्षक शंतनू पांडव यांचा समावेश होता .

छाया– संतोष सोनवणे

पुण्य नगरी

'जिजामाता 'च्या कबड्डीपटूंचे यश कौतुकास्पद : अभंग

भेंडा : विजेत्या खेळाडुंसमवेत प्रशिक्षक व शिक्षक आदी. (छाया : नामदेव शिंदे)

भेंडा : जिजामाता महाविद्यालयाच्या कबड्डीपटूंचे यश कौतुकास्पद असून भविष्यातील खेळाडूंना हे यश प्रेरणादायी ठरेल, असे गौरवोद्गार माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी काढले.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाने आयोजित केलेल्या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून अभंग बोलत होते. भिवंडी येथे झालेल्या ६९व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत नगरच्या पुरुष संघाने १९९९ नंतर प्रथमच अंतिम फेरीत प्रवेश मिळवत मुंबई शहरचा कप्तान शंकर गदई याने सुवर्ण चढाईच्या डावात ३२-३१ असा पराभव करीत, पहिल्यांदाच श्रीकृष्ण करंडकावर अहमदनगर जिल्ह्याचे नाव कोरले.

यातील चार विद्यार्थी श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाचे आणि एक विद्यार्थी हा पहिगाव येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाचा आहे. यातही विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे विजेत्या अहमदनगर संघाचा कप्तान शंकर गदई हा जिजामाता महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ महाविद्यालयात आयोजित केला होता.

अहमदनगर जिल्ह्याच्या विजयी संघातील गदई शंकर भिमराज (कप्तान), आहाणे राम बाबासाहेब, धनवडे राहुल गोरख, खाटिक राहुल बाबासाहेब यांचा; तसेच प्रशिक्षक सतीश मोरकर, शिवाजी बाबळे, परशुराम नाकाडे, राजेंद्र वाघकर, प्रा. दत्ता वाकचौरे, रघुनाथ मोरकर यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संचालक काशिनाथ नवले, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, गणेश गव्हाणे, प्राचार्य सोपानराव मते, प्राचार्य डॉ. रामकिसन सासवडे, उपप्राचार्य डॉ. रमेश नवले, प्रा. पांडुरंग देशमुख आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. मोहिनी साठे यांनी केले.

Smart Shrirampur
Page No 4 March 06, 2021

दिव्य मराठी अहमदनगर 16-07-2022

संघभावनेने खेळल्यास जीवनातही यश : गव्हाणे

प्रतिनिधी | कुकाणे

संघभावनेने खेळल्यास युवक जीवनात यशस्वी, तर होतोच शिवाय धाडसी वृत्ती वाढून जीवनाचा दर्जा उंचावून आयष्यमानही वाढू शकते. विजयासाठी खेळाडुंनी अंगभुत कौशल्यास डावपेच व व्युहरचनेचीही जोड द्यावी, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव गणेश गव्हाणे यांनी सांगितले. हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे सराव शिबिर भेंडे येथे पार पडल्यानंतरच हा संघ हरियाणाला रवाना होण्यापूर्वी संघनायक शंकर गदाई व राहुल खाटीक यांच्यासह सर्व खेळाडू व प्रशिक्षकांचा सत्कार गव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. खेळ हा उपयुक्त छंद असल्याचे सांगतानाच गव्हाणे यांनी खेळाने शारिरीक विकासासोबतच व्यायाम, तर होतोच शिवाय शरीर लवचिक व सद्दढ होत असल्याचे सांगितले. प्रा. दत्ता वाकचौरे, अभिजित राऊत, बाबासाहेब गव्हाणे, रघुनाथ मोरकर, चव्हाण, पठाण आदींसह खेळाडू यावेळी उपस्थित होते.

दिव्य मराठी
अहमदनगर सिटी 07-07-2022

संघ भावना ठेवल्यास महाराष्ट्राच्या कबड्डी संघाचा विजय निश्चित

कबड्डी असोसिएशनचे प्रा. शशिकांत गाडे यांचे मत

जिजामाता महाविद्यालय परिसरातील हॉलमध्ये सराव करताना खेळाडू.

प्रतिनिधी | नेवासे

नगर जिल्ह्याचा संघ सांघिक भावनेने खेळल्यामुळेच राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये विजयी झाला होता आणि महाराष्ट्राच्या कबड्डीच्या इतिहासात नगर जिल्ह्याने प्रथमच विजय मिळवला. यामध्ये खेळाडूची संघ भावना आणि चिकाटी या दोन गोष्टीमुळे हे शक्य झाले. त्यामुळे नगर जिल्ह्याच्या खेळाडूंचा विश्वास वाढला म्हणून मी राज्य कबड्डी

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार पांडुरंग अभंग होते. यावेळी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे जिजामाता महाविद्यालयाचा विद्यार्थी शंकर गदई यास महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन यांच्याकडून दिला जाणारा या वर्षाचा उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्याचाही सत्कार प्रमुख पाहुण्याच्या हस्ते झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. सासवडे यांनी मनोगत व्यक्त

सांघिक भावना ठेवल्यास महाराष्ट्र कबड्डी संघाचा विजय निश्चित : प्रा. गाडे

राज्य पुरुष गट संघ निवड शिबिरास भेंड्यातील जिजामाता महाविद्यालयात प्रारंभ

भेंडा (वार्ताहर)– खेळाडूंनी संघ भावना ठेवल्यास महाराष्ट्र कबड्डी संघाचा विजय निश्चित असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे यांनी केले.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरुष गट संघ निवड शिबिराचे उद्घाटन प्रा. शशिकांत गाडे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग अध्यक्षस्थानी होते.

अहमदनगर कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष जयंत वाघ, खजिनदार प्रकाश बोरुडे, सहसेक्रेटरी विजय मिस्कीन, जिल्हा क्रीडा कार्यालयाचे कबड्डीचे मार्गदर्शक श्री. खुरंगे,शंतनू पांडव, ज्ञानेश्वर कारखान्याचे सचालक काकासाहेब शिंदे, अशोकराव मिसाळ, शिवाजीराव कोलते, सचिव रवींद्र मोटे, विलास लोखंडे, प्राचार्य डॉ. रामकिसन मासबदे, डॉ. श्यामसुंदर कौशिक, डॉ. शिवाजी शिंदे, गणेश गव्हाणे, नामदेव निकम, उपप्राचार्य संभाजी काळे, प्राचार्य सोपान काळे, शिवाजी बाबळे, फिटनेस कोच पुरुषोत्तम प्रभू, रणवीर क्रीडा मंडळाचे अध्यक्ष सोपान महापुरे, बंडू भागवत, परशराम नाकाडे, सोपान काळे, संतोष औताडे, दिलदार शेख, बंडू घोडेचोर, रघुनाथ मोरका आदी उपस्थित होते.

प्रा. गाडे म्हणाले, नगर जिल्ह्याचा संघ सांघिक भावनेने खेळल्यामुळेच राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये विजयी झाला होता आणि महाराष्ट्राच्या कबड्डीच्या इतिहासात अहमदनगर जिल्ह्याने प्रथमच विजय मिळवला आहे. खेळाडूची संघ भावना आणि चिकाटी या दोन गोष्टीमुळे हे शक्य झाले. त्यामुळे नगर जिल्ह्याच्या खेळाडूंचा विश्वास वाढला म्हणून मी राज्य कबड्डी असोसिएशनला शिबिर आयोजन करण्याची संधी आमच्या जिल्ह्याला द्या, ही मागणी केली. यांनी आमची मागणी मान्य केली. त्यामुळे जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाला हे शिबिर आयोजन करण्याचा मान मिळाला आहे. शिबिरासाठी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील, माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, कारखान्याचे उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग व शिक्षण संस्थेचे सर्व विश्वस्त या सर्वांचे हे शिबिर आयोजित केल्याबद्दल आभार मानले.

माजी आमदार पांडुरंग अभंग म्हणाले, राज्य कबड्डी असोसिएशनने हे शिबिर भविष्याची आम्हाला संधी दिली आहे. हे शिबिर आम्ही यशस्वी करू. सर्व खेळाडूनी एकजुटीने खेळून महाराष्ट्राचा कबड्डी संघ विजयी करावा.

राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिजामाता महाविद्यालयाचा विद्यार्थी शंकर गदई यास महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचा उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्याचाही सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाला.

महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. दत्ता बाकलीवाल यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. संभाजी काळे यांनी आभार मानले.

शिबिराचे मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने प्रशांत चव्हाण (एआर इंडिया) यांची मुख्य मार्गदर्शक म्हणून नियुक्ती केली आहे. संघव्यवस्थापक म्हणून अजुब पठाण हे काम पाहत आहेत. या शिबिरातून बारा खेळाडूंचा संघ निवडून दि. २१ ते २५ जुलै या कालावधीत चरखी दादरी (हरियाणा) येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

दि. ७ जुलै २०२२ रोजी निवड समिती राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या महाराष्ट्राच्या संघाची निवड करणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंची नऊ दिवसाचे शिबीरही भेंडा येथील जिजामाता महाविद्यालयात होणार आहे. या ठिकाणाहून हा संघ हरियाणा येथील राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होणार आहे.

अशा प्रकारचे शिबिर नगर जिल्ह्यात तसेच भेंडे सारख्या ग्रामीण भागात आयोजित केल्यामुळे जिल्ह्यातील व तालुक्यातील कबड्डी प्रेमी, नागरिक, कबड्डी खेळाडू विद्यार्थी, कबड्डी मध्ये नावाजलेल्या महाराष्ट्रातील कबड्डी खेळाडूंचा खेळ पाहण्यासाठी सकाळी ६ ते ९ व सायंकाळी ६ ते ९ या वेळेत महाविद्यालयात येऊन त्यांचा खेळ बघण्याचा आनंद लुटत आहे.

शिबिर यशस्वी करण्यासाठी श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे सचिव अनिल शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी महाविद्यालयाचे माजी खेळाडू, सर्व विद्यार्थी, रणवीर क्रीडा मंडळाचे अध्यक्ष व सर्व सदस्य प्रयत्न करीत आहे.

जिजामाता महाविद्यालयाचा शंकर गदई महाराष्ट्राच्या कबड्डी संघाचा कर्णधारपदी निवड ही नेवासा तालुक्याच्या दृष्टिकोनातून अभिमानास्पद– पोलीस निरीक्षक विजय करे

जनशक्ती

नेवासा प्रतिनिधी –

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्री.मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई यांच्या सहकार्याने अहमदनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित ६९ वे महाराष्ट्र राज्य पुरुष गट संघ निवड समारोप समारंभ संपन्न झाला याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विजय करे यांनी आपल्या भाषणातून खेळाडूंना स्वयंशिस्त, मेहनत, कष्ट ,संघ भावना व चिकाटी ध्येय ठेवून प्रयत्न केले तर महाराष्ट्राचा संघ नक्कीच विजयी होईल ही भावना व्यक्त करून महाराष्ट्राच्या कबड्डी संघाला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या, आपण केलेला सराव आणि संघाचा सामूहिक प्रयत्नमुळे हा संघ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत नक्कीच विजयी होईल असा विश्वास श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी अध्यक्षपदावरून बोलताना व्यक्त केला . ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे मार्गदर्शक मा. आमदार नरेंद्र घुले पाटील साहेब तसेच माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली भेंडे सारख्या ठिकाणी ग्रामीण भागात हे पंधरा दिवसाचे शिबिर पार पाडू शकलो शिक्षण संस्थेचे सर्व विश्वस्त कारखान्याचे सर्व पदाधिकारी महाविद्यालयातील प्राध्यापक जिजामाता महाविद्यालयाचे माजी खेळाडू यांनी हे शिबीर यशस्वी करण्यासाठी मोलाची मदत केली त्यामुळेच हे शिबीर आम्ही यशस्वीपणे पार पडू शकलो अशी भावना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर .आर .मासवडे यांनी व्यक्त केली.

.याप्रसंगी महाराष्ट्राच्या कबड्डी संघात निवड झालेल्या सर्व खेळाडूंचा सत्कार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नेवासा तालुका पोलीस स्टेशनची विजय करे साहेब यांच्या हस्ते करण्यात आला. शिबिराच्या समारोपाच्या कार्यक्रम प्रसंगी महाराष्ट्र कबड्डी संघाचे प्रशिक्षक प्रशांत चव्हाण यांनी शिबिराच्या आयोजनाबद्दल व खेळाडूंना मिळालेल्या चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल शिक्षण संस्थेचे व महाविद्यालयाचे विशेष आभार मानून समाधान व्यक्त केले या कार्यक्रमास ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे विश्वस्त माननीय काशिनाथ अण्णा नवले पाटील अशोकराव मिसाळ ,शिवाजीराव कोलते पाटील ,दादासाहेब गडाळ, शिक्षण संस्थेचे सचिव ,अनिल राव शेवाळे सहसचिव रवींद्र मोटे, कल्याणराव म्हस्के, किशोर भणगे , दत्ताजी खाटीक , मालोजीराव भुसारी, त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ.रमेश नवले उपप्राचार्य प्रा. डॉ. संभाजी काळे पुणे मराठी विद्यापीठ अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ. शिरीष लांडगे पाटील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते, रणवीर क्रीडा मंडळाचे अध्यक्ष सोपान महापूर, बंडू भागवत, परसराम नाकाडे, राजू बावकर, पंजाब शिंदे , रघुनाथ मोरकर, त्याचबरोबर महाविद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

पुण्य नगरी

राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी संघ हरियाणा येथे रवाना

भेंडा : संघ भावनेने खेळल्यास युवक खेळा बरोबरच जीवनात पण यशस्वी होतो, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव भेंडा गावचे माजी सरपंच गणेश गव्हाणे यांनी केले. हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेच्या राज्यस्तरीय सराव शिबीर भेंडा येथे चालू होते. हरियाणाला रवाना होण्यापूर्वी ग्रामस्थांनी त्यांचा सन्मान केला. त्याप्रसंगी गव्हाणे बोलत होते. यावेळी प्रा. दत्ता वाकचौरे, चव्हाण, पठाण, प्रभू, नामदेव शिंदे, बाबासाहेब गव्हाणे, अभिजित राऊत, रघुनाथ मोरकर आदी उपस्थित होते. ग्रामस्थांनी यावेळी संघ नायक शंकर गदाई, राहुल खाटीक सह सर्व राष्ट्रीय खेळाडूंचा व प्रशिक्षक यांचा सन्मान केला.

Smart Shrirampur
Page No.3 July 17, 2022

सकाळ

राज्य कबड्डी संघाचा भेंडे येथे सत्कार

नेवासे, ता. १६ : हरियानामध्ये होत असलेल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघातील खेळाडूंचा भेंडे (ता. नेवासे) येथे ग्रामस्थांनी नागरी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

राज्य कबड्डी संघाचे कर्णधार शंकर गदाई भेंडे येथील रहिवासी असून, त्यांच्यासह संघातील सर्व खेळाडूंचा माजी सरपंच गणेश गव्हाणे यांनी फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

यावेळी प्रा. दत्ता वाकचौरे, अभिजित राऊत, रघुनाथ मोरकर, बाबासाहेब गव्हाणे, नामदेव शिंदे उपस्थित होते. गदाई यांनी, हा सन्मान ऊर्जा देणारा असल्याचे सांगितले.

भेंडे (ता. नेवासे) : येथील ग्रामस्थांच्या वतीने राज्य कबड्डी संघाचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. (छायाचित्र : विनायक दंडले)

Nagar, Main
17/07/2022 Page No. 4

राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी राज्य संघाची निवड

भेंड्याच्या शंकर गदई व राहुल खाटिकचा समावेश

भेंडा, दि. १२ (वार्ताहर) - भेंडा येथे झालेल्या निवडचाचणी शिबिरातून ६९व्या वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशिपसाठी महाराष्ट्र पुरुष कबड्डी संघाची निवड करण्यात आली. यात भेंड्याच्या संघात शंकर गदई व राहुल खाटिक या दोन खेळाडूंचा समावेश झाला आहे.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयात निवड शिबिर पार पडले. राज्य संघटनेचे सचिव आस्वाद पाटील, मंगल पांडे, तसेच सचिन भोसले यांनी मार्गदर्शन केले.

राज्यातील विविध जिल्ह्यांतील एकूण २८ खेळाडू शिबिरात सहभागी झाले होते. हा संघ दि. २१ ते २५ जुलै या कालावधीत चरकी दादरी, हरियाणा येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. संघाचे प्रा. शशिकांत गाडे, माजी आ. नरेंद्र घुले, माजी आ. चंद्रशेखर घुले, माजी आ. पांडुरंग अभंग, डॉ. क्षितिज घुले, अनिल शेवाळे, रवींद्र मोटे आदींनी अभिनंदन केले. शंकर गदई, राहुल खाटिक (दोघे नगर), मयूर कदम (रायगड), अक्षय भोईर, असलम इनामदार (दोघे ठाणे), आकाश शिंदे (नाशिक), अरकम शेख (मुंबई उपनगर), शेखर तटकरे (रत्नागिरी), सिद्धेश पिंगळे, अक्षय उगाडे (दोघे मुंबई शहर), किरण मगर (नांदेड), देवेंद्र कदम (धुळे) आदींचा संघात समावेश आहे.

पुण्य नगरी

राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघाची निवड

भेंडा: येथे झालेल्या निवड चाचणी शिबिरातून ६९ व्या वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशिप २०२२ साठी महाराष्ट्राचा पुरुष कबड्डी संघाची निवड करण्यात आली.भेंड्याचे शंकर गदई व राहुल खाटीक या दोन खेळ्याडूंचा राष्ट्रीय संघात समावेश झाला आहे.

येथील श्री.मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई यांच्या सहकार्याने अहमदनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र राज्य पुरुष गट संघ निवड शिबीर पार पडले.त्यात अहमदनगर जिल्हा (५), मुंबई शहर (४) ,मुंबई उपनगर (३) ,ठाणे जिल्हा (३) ,रायगड जिल्हा (१) ,रत्नागिरी जिल्हा (२), पुणे जिल्हा (२) ,अहमदनगर जिल्हा (५), सांगली जिल्हा (१) ,नाशिक जिल्हा (१) ,धुळे जिल्हा (२), बीड जिल्हा (१), जालना (१), नांदेड जिल्हा (२), नंदुरबार जिल्हा (१) असे एकूण २८ खेळाडू या शिबिरामध्ये सहभागी झाले होते.या शिबिरातून निवडलेला हा बारा खेळाडूंचा संघ दि. २१ जुलै ते २५जुलै या कालावधीत चरकी दादरी हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठीमहाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे सचिव आस्वाद पाटील, खजिनदार मंगल पांडे तसेच महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे प्रशासकीय अधिकारी सचिन भोसले यांनी शिबिराला भेट देऊन खेळाडूंना मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड समितीचे सदस्य संजय मोकल, संजय सूर्यवंशी, आमदार योगेश पाटील या समितीने निवड केलेल्या महाराष्ट्र संघात शंकर गदई,मयूर कदम,असलम इनामदार,आकाश शिंदे ,राहुल खाटीक, अरकम शेख,शेखर तटकरे,सिद्धेश पिंगळे,अक्षय उगाडे,किरण मगर , देवेंद्र कदम,अक्षय भोईर या खेळाडूंचा समावेश आहे.

भेंड्याच्या गदई व खाटीक यांचा समावेश

भेंडा:महाराष्ट्र संघात निवड झालेल्या खेळाडू समवेत श्री.मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष,माजी आमदार नरेंद्र घुले पाटील,विश्वस्त डॉ. क्षितिज घुले पाटील,सचिव अनिल शेवाळे,प्राचार्य रामकिसन सासवडे,प्रा. दत्ता वाकचौरे. (छाया:नामदेव शिंदे)

Smart Shrirampur
Page No.3 July 13, 2022

भारतनामा
Tuesday - 12 Jul 2022 - Page 4

भेंड्याच्या शंकर गदई व राहुल खाटीकची राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

भारतनामा
नेवासा फाटा (अल्ताफ शेख)

भेंडा येथे झालेल्या निवड चाचणी शिबिरातून ६९ व्या वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशिप २०२२ साठी महाराष्ट्राच्या पुरुष कबड्डी संघाची निवड करण्यात आली असून भेंड्याचे संघात शंकर गदई व राहुल खाटीक या दोन खेळाडूंचा समावेश झाला आहे.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्री.मालतारव पुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता ज्ञान व कला महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई यांच्या सहकार्याने अहमदनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित ६९ वे महाराष्ट्र राज्य पुरुष गट संघ निवड शिबिर पार पडले.

त्यात अहमदनगर जिल्हा (५), मुंबई शहर (४), मुंबई उपनगर (३), ठाणे जिल्हा (३), रायगड जिल्हा (१), रत्नागिरी जिल्हा (२), पुणे जिल्हा (२), अहमदनगर जिल्हा (५), सांगली जिल्हा (१), नाशिक जिल्हा (१), धुळे जिल्हा (२), बीड जिल्हा (१), जालना (१), नांदेड जिल्हा (२), गंगुलवार जिल्हा (१) असे एकूण २८ खेळाडू या शिबिरामध्ये सहभागी झाले होते. या शिबिरातून निवडलेला हा चमू खेळाडूंचा संघ दि. २१ जुलै ते २५ जुलै या कालावधीत चाकी दादरी हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.

दिनांक ७ जुलै २०२२ रोजी महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे सचिव आमदार पाटील खासिदार मंगल पांडे तसेच महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे प्रशासकीय अधिकारी सचिन भोसले यांनी शिबिरातल्या भेट देऊन खेळाडूंना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे, श्री.मारतराव पुले पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पुले पाटील, उपाध्यक्ष माजी आमदार चंद्रशेखर पुले पाटील, विश्वस्त माजी आमदार पांडुरंग अभंग, डॉ.विनिल पुले पाटील, सचिव अनिल शेवाळे, सहसचिव रवींद्र मोटे,प्राचार्य डॉ. रामकीसन मासवडे, प्रशिक्षक शिक्षण संचालक प्रा.दत्ता वाकचौरे, अहमदनगर कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष जयंत पाय, खजिनदार प्रकाश घोरडे, सहसेक्रेटरी विजय मिस्कीन, अहमदनगर जिल्हा क्रीडा कार्यालयाचे कबड्डीचे मार्गदर्शक श्री.खुरंगे,शंतनू पांडव आदींनी निवड झालेल्या संघाचे अभिनंदन केले.

राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड

भेंड्यातील शंकर गदई व राहुल खाटीकचा समावेश

जनभूमी भेंडा : प्रतिनिधी

भेंडा येथे झालेल्या निवड चाचणी शिबिरातून ६९ व्या वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशिप २०२२ साठी महाराष्ट्राच्या पुरुष कबड्डी संघाची निवड करण्यात आली असून भेंड्यातील शंकर गदई व राहुल खाटीक या दोन खेळाडूंचा समावेश झाला आहे. नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्री.मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई यांच्या सहकार्याने अहमदनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित ६९ वे महाराष्ट्र राज्य पुरुष गट संघ निवड शिबिर पार पडले. त्यात अहमदनगर जिल्हा (५), मुंबई शहर (४) ,मुंबई उपनगर (३) ,ठाणे जिल्हा (३) ,रायगड जिल्हा (१) ,रत्नागिरी जिल्हा (२), पुणे जिल्हा (२) ,अहमदनगर जिल्हा (५), सांगली जिल्हा (१) ,नाशिक जिल्हा (१) ,धुळे जिल्हा (२), बीड जिल्हा (१), जालना (१), नांदेड जिल्हा (२), नंदुरबार जिल्हा (१) असे एकूण २८ खेळाडू या शिबिरामध्ये सहभागी झाले होते.या शिबिरातून निवडलेला हा चारा खेळाडूंचा संघ दि. २१ जुलै ते २५ जुलै या कालावधीत चरखी दादरी ,हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. दिनांक ७ जुलै २०२२ रोजी महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे सचिव आस्वाद पाटील, खजिनदार मंगल पांडे तसेच राष्ट्रीय निवड समितीचे सदस्य संजय भोकल, संजय सूर्यवंशी, आमदार योगेश पाटील या समितीने निवड केलेल्या महाराष्ट्र संघातील खेळाडू

शंकर गदई (अहमदनगर), मयूर कदम (रायगड),असलम इनामदार (ठाणे),आकाश शिंदे (नाशिक),राहुल खाटीक (अहमदनगर), अरकम शेख (मुंबई उपनगर),शेखर तटकरे (रत्नागिरी),सिद्धेश खिंगळे (मुंबई शहर),अक्षय उगाडे (मुंबई शहर),किरण मगर (नांदेड), देवेंद्र कदम (धुळे),अक्षय भोईर (ठाणे)

महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे प्रशासकीय अधिकारी सचिन भोसले यांनी शिबिराला भेट देऊन खेळाडूंना मार्गदर्शन केले.महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे, श्री.मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील, उपाध्यक्ष माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, विश्वस्त माजी आमदार पांडुरंग अभंग,डॉ.क्षितिज घुले पाटील, सचिव अनिल शेवाळे, सहसचिव रवींद्र मोरे,प्राचार्य डॉ.रामकीसन सासवडे,शारीरिक शिक्षण संचालक प्रा.दत्ता वाकचौरे, अहमदनगर कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष जयंत वाघ, खजिनदार प्रकाश बोकडे, सहसेक्रेटरी विजय मिस्कीन, अहमदनगर जिल्हा क्रीडा कार्यालयाचे कबड्डीचे मार्गदर्शक श्री.खुरंगे,शंतनू पांडव आदींनी निवड झालेल्या संघाचे अभिनंदन केले.

महाराष्ट्र संघात निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करतांना श्री.मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार डॉ .नरेंद्र घुले पाटील ,विश्वस्त डॉ.क्षितिज घुले पाटील,सचिव अनिलराव शेवाळे आदी .

(छायाचित्र –संतोष सोनवणे)

राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशीपसाठी महाराष्ट्राच्या संघाची निवड

■ भेंड्याच्या शंकर गदाई व राहुल खाटीकचा समावेश

महाराष्ट्र कबड्डी संघात निवड झालेल्या खेळाडूंसमवेत श्री.मारुतराव पुते पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पुते पाटील, विश्वस्त डॉ. हितेश पुते पाटील, सचिव अनिल सेवाळे.

भेंडा (वार्ताहर)–भेंडा येथे झालेल्या निवड चाचणी शिबिरातून ६९ व्या वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशिप २०२२ साठी महाराष्ट्राच्या पुरुष कबड्डी संघाची निवड करण्यात आली असून संघात भेंडा येथील शंकर गदाई व राहुल खाटीक या दोन खेळाडूंचा समावेश झाला आहे.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्री.मारुतराव पुते पाटील शिक्षण संस्थेच्या विज्ञानाता शास्त्र व कला महाविद्यालयाच्या महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन पुरुष यांच्या सहकार्याने अहमदनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित ६१ वे महाराष्ट्र राज्य पुरुष गट संघ निवड शिबिर पार पडले.

त्यात अहमदनगर जिल्हा (५), मुंबई शहर (४), मुंबई उपनगर (३), ठाणे जिल्हा (३), रायगड जिल्हा (१), रत्नागिरी जिल्हा (२), पुणे जिल्हा (२), अहमदनगर जिल्हा (५), सांगली जिल्हा (१), नाशिक जिल्हा (१), पुळे जिल्हा (२), बीड जिल्हा (१), जालना (१), नांदेड जिल्हा (२), नंदुरबार जिल्हा (१) असे एकूण २८ खेळाडू या शिबिरामध्ये सहभागी झाले होते.

या शिबिरातून निवडलेला हा बारा खेळाडूंचा संघ दि. २१ ते २५ जुलै या कालावधीत चाकी दादरी (हरियाणा) येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे, महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे प्रशासकीय अधिकारी सचिन भोसले, श्री.मारुतराव पुते पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पुते पाटील, उपाध्यक्ष माजी आमदार चंद्रशेखर पुते पाटील, विश्वस्त माजी आमदार पांडुरंग अभंग, डॉ. हितेश पुते पाटील, सचिव अनिल सेवाळे, सहसचिव नरेंद्र मोरे, प्राचार्य डॉ. रामकिसन सासवडे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. दत्ता वाकचौरे, अहमदनगर कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष जयंत बाम, खजिनदार प्रकाश बोरुडे, सहसेक्रेटरी विजय सिनकीन, अहमदनगर जिल्हा क्रीडा कार्यालयाचे कबड्डीचे मार्गदर्शक श्री. खुणे, संतू पाडळ आदींनी निवड झालेल्या संघाचे अभिनंदन केले. महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे सचिव आनंद पाटील यांनी शिबिराला भेट दिली.

महाराष्ट्र संघासाठी निवडलेले १२ खेळाडू

- निवड समिती सदस्य संजय नोकल, संजय सूर्यवंशी, आमदार बोरुडे पाटील यांनी राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड केलेल्या महाराष्ट्र संघात शंकर गदाई व राहुल खाटीक (दोघेही भेंडा, अहमदनगर), अतुलन इनामदार (ठाणे), मयूर कदम (सांगली), आकाश शिंदे (नाशिक), अरुलन शेडा (मुंबई उपनगर), सौरभ तटकरे (रत्नागिरी), सिद्धेश खिल्डे (मुंबई शहर), अक्षय उगाडे (मुंबई शहर), विनय नगर (नांदेड), देवेंद्र कदम (पुणे), अक्षय भोईर (ठाणे) यांचा समावेश आहे.

संघ भावना ठेवल्यास महाराष्ट्राच्या कबड्डी संघाचा विजय निश्चित- प्रा. शशिकांत गाडे

सुनिल पंडित

कुकाणे (वार्ताहर) : भेंडे येथील ज्ञानेश्वर कारखान्याच्या कार्यस्थळावरील जिजामाता महाविद्यालयात राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र संघाच्या निवड चाचणी शिबिराचा उद्घाटन समारंभ पार पडला.

वरिष्ठ पुरुष गट संघ निवड शिबिराचे आयोजन राज्य कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि जिजामाता महाविद्यालय आयोजित ६९ व्या राज्य पुरुष गट संघ निवड शिबिराचे उद्घाटन राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग अभंग होते.

यावेळी बोलताना गाडे म्हणाले, जिल्ह्याचा संघ सांघिक भावनेने खेळल्यामुळेच राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये विजयी झाला होता आणि राज्यच्या कबड्डीच्या इतिहासात जिल्ह्याने प्रथमच विजय मिळवला. यामध्ये खेळाडूची संघभावना आणि चिकाटी या गोष्टीमुळे हे शक्य झाले. त्यामुळे जिल्ह्याच्या खेळाडूंचा विश्वास वाढला आहे.

या शिबिरासाठी ज्ञानेश्वर उद्योगसमूहाचे प्रमुख नरेंद्र घुले, माजी आ. चंद्रशेखर घुले, शिक्षणसंस्थेचे सर्व संचालक आदींनी सहकार्य केले. हे शिबीर १ ते १५ जुलैदरम्यान होणार आहे. या शिबिराचे मार्गदर्शक म्हणून राज्य कबड्डी असोसिएशनने एअर इंडियाचे प्रशांत चव्हाण यांची मुख्य मार्गदर्शक म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच संघ संघव्यवस्थापक म्हणून आयुब पठाण हे काम पाहत आहेत. या शिबिरातून १२ खेळाडूंचा संघ निवडला जाणार असून, २१ ते २५ जुलै या कालावधीत चरकी दादरी (हरयाना) येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी राज्याचे प्रतिनिधित्व हा संघ करेल.

पत्रकार सुनिल पंडित कुकाणा

भारतनामः
Monday - 04 Jul 2022 - Page 2

संघ भावना ठेवल्यास महाराष्ट्राच्या कबड्डी संघाचा विजय निश्चित- प्रा. शशिकांत गाडे

भारतनामः
नेवासा (मोहन गायकवाड)

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावरील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयात राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र संघाच्या निवड चाचणी शिबीराचा उद्घाटन समारंभ शनिवार दिनांक २ जुलै २०२२ रोजी पार पडला.

वरिष्ठ पुरुष गट संघ निवड शिबिराचे आयोजन महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई यांच्या सहकार्याने अहमदनगर जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि जिजामाता शास्त्र कला महाविद्यालय ज्ञानेश्वर नगर आयोजित ६९ वे महाराष्ट्र राज्य पुरुष गट संघ निवड शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन चे उपाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे यांच्या शुभहस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग हे होते . यावेळी बोलताना प्राध्यापक शशिकांत गाडी यांनी सांगितले नगर जिल्ह्याचा संघ सांघिक भावनेने खेळल्यामुळेच राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये विजयी झाला होता आणि महाराष्ट्राच्या कबड्डीच्या इतिहासात अहमदनगर जिल्ह्याने प्रथमच विजय मिळवला आहे. यामध्ये खेळाडूची संघ भावना आणि चिकाटी या दोन गोष्टीमुळे हे शक्य झाले त्यामुळे नगर जिल्ह्याच्या खेळाडूंचा विश्वास वाढला म्हणून मी राज्य कबड्डी असोसिएशनला शिबिर आयोजन करण्याची संधी आमच्या जिल्ह्याला द्या ही मागणी केली.

त्यांनी आमची मागणी मान्य केली त्यामुळे श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाला हे शिबिर आयोजन करण्याचा मान मिळाला आहे. या शिबिरासाठी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे प्रमुख माजी आमदार नरेंद्र घुले पाटील साहेब माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील साहेब कारखान्याचे उपाध्यक्ष मा.आमदार पांडुरंग अभंग साहेब व शिक्षण संस्थेचे सर्व संचालक मंडळ, या सर्वांचे हे शिबिर आयोजित केल्याबद्दल आभार मानले.भेंडा येथील मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र कला महाविद्यालयात राज्य कबड्डी असोसिएशन ने अशा प्रकारचे शिबिर भरण्याची संधी दिली आणि ते शिबिर आम्ही यशस्वी करू , तुम्ही सर्व खेळाडूंनी एकजुटीने सराव करून खेळून महाराष्ट्राचा कबड्डी संघ नक्कीच विजय होईल अशा शुभेच्छा माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी अध्यक्षपदावरून बोलताना दिल्या.

यावेळी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे जिजामाता महाविद्यालयाचा विद्यार्थी श्री शंकर गदई यास महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन यांच्याकडून दिला जाणारा या वर्षाचा महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्याचाही सत्कार प्रमुख पाहुण्याच्या हस्ते झाला. भेंडा येथील रणवीर क्रीडा मंडळाचे अध्यक्ष सोपान महापूर, बंडू भागवत, परसराम नाकाडे, सोपान काळे, संतोष औताडे (पत्रकार) त्याचबरोबर मंडळाचे सर्व सदस्य हे शिबिर यशस्वी करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे.

पुढारी

'कॉलेज की टीम लेके आया है क्या' हरियाणामध्ये हिणवले

पण खेळाडूंनी राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेतील उपविजेतेपद खेचून आणले : प्रशिक्षक प्रशांत चव्हाण

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

हरियाणा येथे झालेल्या ६९व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राने नवोदित खेळाडूंना संधी देताना उपविजेतेपद खेचून आणले. मात्र, एकूण अनुभव केवळ होता. नवोदित खेळाडू पाहता 'कॉलेज की टीम लेके आया है क्या', असे हिणवण्यात आले. मात्र, कबड्डीपटूंनी माझा विश्वास सार्थ ठरवला, असे महाराष्ट्र पुरुष कबड्डी संघाचे प्रशिक्षक प्रशांत चव्हाण यांनी सांगितले.

अनुभवी खेळाडूंचा अधिकाधिक समावेश पाहता कमी संघ चेंडन चालतील, अशी चर्चा हरियाणाला रवाना होण्यापूर्वी महाराष्ट्रातही सुरू होती. सर्वांच्या टिकाकीही आमची पट्टा ठरवण्यात आली. 'कॉलेजचा संघ आपला का,' असे बोलले जात होते. आमचा संघ बाद फेरीही पार करणार नाही, असे सर्वांना वाटत होते. मात्र, मला माझ्या खेळाडूंवर विश्वास होता. त्यांनी माझा विश्वास सार्थ ठरवला. कमाचे श्रेय सर्व खेळाडूंना जाते. नवोदित खेळाडूंचा संघ घेऊन गेलो आणि उपविजेतेपद मिळवले, याचा अभिमान वाटतो, असे चव्हाण पुढे म्हणाले.

सांघिक कामगिरी उंचावण्यात खेळाडींत साहाय्यक संदुस्ती महत्त्वाची असते. आम्ही फिटनेसला अधिक महत्त्व दिले, असे प्रशांत यांनी यावेळी अधोरेखित केले. राष्ट्रीय स्पर्धे साठीच्या निवडचाचणीमध्ये २८ जणांचा समावेश होता. त्यातून १२ खेळाडूंची निवड करण्यात आली. महाराष्ट्र संघाने सराव शिबीर १५ दिवसांचे होते. यात संदुस्ती उत्तमरीत्या पार होता. त्याचा सकारात्मक परिणाम असा दिसून आला की, संपूर्ण स्पर्धेत आमचा एकही खेळाडू चकलेला दिसला नाही. प्रत्येक खेळाडूने फिटनेस राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यामुळे आम्हाला अंतिम फेरीत पराक्रम मारले गेले, असे ते म्हणाले.

किमान सात खेळाडू

● राष्ट्रीय स्पर्धेतील उंचावलेल्या कामगिरीचा फायदा सर्वच खेळाडूंना होईल. अलमप्रीत बधू आणि आकाश शिंदे हे प्रो-कबड्डी लीगमध्ये खेळलेले आहेत. मात्र, आगामी किमान सात खेळाडूंना लीगचे दरवाजे खुले होतील, असा विश्वास प्रशिक्षक प्रशांत चव्हाण यांनी व्यक्त केला.

कटवर साखळीसह सहा सामने खेळवण्यात येत असल्याने तिसरे ही आव्हान खिंडित होते, असे चव्हाण यांनी सांगितले. स्पर्धेतील सर्व प्रतिस्पर्धी तगडे होते. मात्र, साखळीमध्ये मिळालेल्या आत्मविश्वासाचा बाद फेरीत फेरफार, पंजाब आणि हरियाणा संघांनीही हरवण्यात आम्हाला यश आले. यजमान हरियाणा संघातील बहुतांशी खेळाडू प्रो-कबड्डी लीगमध्ये खेळलेले होते. महाराष्ट्र संघात अंतिम हजामदार आणि बधू कदम हेच अनुभवी होते. अन्य खेळाडूंनी एकमेकांही प्रो-कबड्डी दूरच, राष्ट्रीय स्पर्धाही खेळलेली नाही. मात्र, आमच्या खेळाडूंमध्ये आत्मविश्वास ठासून भरलेला होता.

सांघिक कामगिरी उंचावण्यात सपोर्टस्टाफ तसेच महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचे मोठे योगदान आहे, असेही प्रशांत यांनी पुढे सांगितले. व्यवस्थापक आदुब पठाण यांच्यासह फिजिओ ट्रेनर पुरुषोत्तम प्रभू, राज्य कबड्डी असोसिएशनचे सचिव आनंद पाटील तसेच सीईओ सचिन भोसले यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. प्रत्येक सामन्यापूर्वी आम्ही प्रतिस्पर्धी संघाचे बलस्थान तसेच कमकुवत बाजूंचा बारकाईने अभ्यास करायचो. त्या संघाने पूर्वीचे सामने पु-टयूबवर पाहायचो. त्याप्रमाणे डावपेच आखले गेले होते, असे चव्हाण यांनी म्हटले.

राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरीचा आढावा घ्यायचा झाल्यास आक्रमण ही जमेची बाजू ठरली. प्रकाश चव्हाण हे आमचे बलस्थान होते. आमचे चढाईपटू जीव तोडून खेळले. त्यामुळे मिळालेले गुण टिकून तेवा. ४० मिनिटांमध्ये एकही पकड झाली नाही सी खालेल, पण प्रतिस्पर्धी संघाला गुण बहाल करू नका, असे बचावपटूंना बजावल्याचे प्रशांत यांनी सांगितले.

Mumbai Edition
Jul 28, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

पुढारी

नेवाशाच्या शिरपेचात मानाचा तुरा

महाराष्ट्र कबड्डी संघाला उपविजेतेपद; कर्णधार शंकर गदईचा सत्कार

नेवासा : पुढारी वृत्तसेवा

हरियाणातील चरखी येथे दि.२१ ते २४ जुलै दरम्यान झालेल्या ६९ व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने उपविजेतेपद मिळविले. या संघाचा कर्णधार भेंडा (ता.नेवासा) येथील जिजामाता विद्यालयाचा विद्यार्थी शंकर गदई याचा नेवासा येथे सत्कार करण्यात आला.

राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पहिल्यांदाच विजेतेपद मिळविणाऱ्या अहमदनगर संघाचे नेतृत्व करणाऱ्या शंकर गदईची पहिल्याच वर्षी महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. शंकर गदई व टिमने राष्ट्रीय स्पर्धेत उपविजेतेपद मिळविल्याने खेळाडूंचा बुधवारी (दि.२७) सत्कार करण्यात आला. यावेळी नेवाशाचे पोलिस निरीक्षक विजय करे, ज्ञानेश्वर कारखान्याचे संचालक काकासाहेब शिंदे, संभाजी पवार, राजेंद्र वाघमारे, शंकर नाबदे, मुकिंदपूरचे सरपंच सतीश निपुंगे, प्रा.बी.जे.टेमक, प्रा.रामकृष्ण माकोणे, प्रा.अशोक एरंडे, ॲड. वैभव वाकचौरे, ॲड.प्रशांत माकोणे, ॲड.प्रदीप वाखुरे, सुहास टेमक, राहुल सूर्यवंशी, विवेक नन्नवरे आदी उपस्थित होते.

नेवासा : शंकर गदई व राहुल खाटीक यांचा सत्कार करताना पोलिस निरीक्षक विजय करे, काकासाहेब शिंदे आदी.(छाया : कैलास शिंदे)

यावेळी पोलिस निरीक्षक करे म्हणाले, राज्य कबड्डी संघाचे नेतृत्व ग्रामीण भागातील शंकर गदई व राहुल खाटीक या दोन खेळाडूंनी केल्याचा सार्थ अभिमान संपूर्ण तालुकावासियांना आहे. सत्काराला उत्तर देताना कर्णधार शंकर गदई म्हणाला, आमचा संघ हा ग्रामीण भागातील असल्याने, प्रत्येक संघ आम्हाला हरविण्याच्या अविर्भावात वागत होता. मात्र, आमचे ध्येय फायनलचे न ठेवता आलेल्या प्रत्येक संघाला चितपट करण्याचे ठरवून आम्ही यशस्वी लढा दिला. ग्रामीण भागातील खेळाडूही कमी नसतात हे दाखवून दिले. पुढील वेळी महाराष्ट्राला नक्कीच विजयश्री खेचून आणू, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. प्रा.दत्तात्रय वाकचौरे यांनी संघाची विशेष देखभाल व काळजी घेतल्याचे गदई व खाटीक यांनी सांगितले.

My Ahmednagar Edition
Jul 29, 2022 Page No. 4

पुढच्यावेळी महाराष्ट्राला 'विजयश्री' खेचून आणणार - कर्णधार शंकर गदई

नेवाशाच्या शिरपेचात संघाने रोवला मानाचा तुरा.. पो.नि.विजय करे यांचे गौरवोद्गार

भारतनामा

नेवासा (मोहन गायकवाड)

चाळी (हरियाणा) येथे (दि.२१ ते २४) जुने वर्ष्यान ६१ व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाला उपविजेतेपदावर समाधानमानले आहे या संघाचे कर्णधार नुकत्याच झालेल्या स्पर्धा संपवून आले असता नेवासा येथे भव्यदिव्य आयोजित करण्यात आला. राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पहिल्यांदाच विजेतेपद मिळविणाऱ्या अहमदनगर संघाचे नेतृत्व करणाऱ्या मेंढे (ता. नेवासा) विद्यामाता विद्यालयाचा विद्यार्थी शंकर गदईची पहिल्यांदाच वरिष्ठ महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली शंकर गदई व टीमने उपविजेते पद मिळविल्याने खेळाडूंचा सत्कार कार्यक्रम (दि.२७) रोजी नेवासा येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नेवासा नगरीचे सपोनि सचिनकुमार सुराणा,पोलिस निरीक्षक विजय करे, नेहरूचे संचालक (व्यवसाय) पवार, पत्रकार राजेंद्र वाघमारे, शंकर नवले, मुकिंदपुरचे सरपंच महिला मिसुरे, प्रा.बी.जे.टेमक, प्रा.रामकृष्ण बाबरे, प्रा.अशोक एरंडे, अँड. वैभव वाकचौरे, अँड. प्रशांत वाकचौरे,अँड.प्रदिप वाघुले,मुख्तार टेमक,राहुल सुर्यवंशी,विवेक नाबदे,नगरसेवक जितेंद्र कुऱ्हे आदी

प्रा.एकनाथ वाकचौरे यांनी संघाची विशेष देखभाल व व्यवस्थापन पाहणाऱ्या संघाचे व्यवस्थापक पोलिस निरीक्षक करे म्हणाले की,राज्य कबड्डी संघाचे नेतृत्व प्रशिक्षण घेणाऱ्या शंकर गदई व राहुल खाटीक या दोन खेळाडूंनी केलेल्या कामगिरीचे कौतुक केले.

मान्यवर पाहुणे उपस्थित होते.पाहुणे बोलताना पोलिस निरीक्षक करे म्हणाले की,राज्य कबड्डी संघाचे नेतृत्व प्रशिक्षण घेणाऱ्या शंकर गदई व राहुल खाटीक या दोन खेळाडूंनी केलेल्या सर्व अभिमान संपूर्ण तालुकावासियांना असल्याचे गौरवोद्गारही पाहुणे काढले व त्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक केले.

पाहुणे मनोगतात उत्तर देताना कर्णधार शंकर गदई पाहुणे म्हणाला की,आमचा संघ हा प्रशिक्षण शिबिरातील असल्यामुळे जो,तो संघ आम्हाला हरविण्यासाठी अतिशय्यांकन खेळत होता मात्र आमचे ध्येय अंतिम पर्यंत सोडायचे न ठेवता आलेल्या संधीचा चिकाटीने करण्याचे ठरवून आम्ही यशस्वी लढा दिला अशी प्रतिक्रिया याप्रसंगी खेळाडूंनी व्यक्त केली नगरला हे राज्यपद मिळवली खेचून आणू असा आत्मविश्वास पाहुणे कर्णधार शंकर गदई व राहुल खाटीक यांनी पाहुणे व्यक्त केला.

राष्ट्रीय कबड्डी उपविजेत्या संघातील भेंड्याच्या खेळाडूंचा आ. गडाखांनी केला सत्कार

भेंडा (वार्ताहर)– हरियाणा येथे झालेल्या ६९ व्या पुरूष वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशिप स्पर्धेतील उपविजेता महाराष्ट्र संघातील भेंडा येथील शंकर भीमराज गदाई व राहुल आबासाहेब खाटिक या खेळाडूंचा माजी मंत्री आ. शंकरराव गडाख यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र संघाचा कर्णधार शंकर गदाई व खेळाडू राहुल खाटीक यांचे दि.२७ रोजी भेंडा येथे आगमन झाले. त्यांची फटाक्याच्या आतषबाजीत बसस्थानक चौक ते नागेबाबा मंदिर व भेंडा खुर्द गावापर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. नागेबाबा मंदिरात माजी जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी या दोन्ही खेळाडूंचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रा. दत्ता वाकचौरे, गणेशराव गव्हाणे, डॉ. शिवाजीराव शिंदे, रवींद्र नवले, सुखदेव फुलारी, बाळासाहेब नवले, भाऊसाहेब गदाई, सोपान महापूर, राजेंद्र वाघडकर, बाबा गव्हाणे, रघू मोरकर आदी उपस्थीत होते.

भेंडा : राष्ट्रीय कबड्डी उपविजेते खेळाडू शंकर गदाई व राहुल खाटिक यांचा सत्कार करताना आमदार शंकरराव गडाख, प्रा. दत्ता वाकचौरे, सुखदेव फुलारी आदी.

खेळाडूंचा गडाखांच्या हस्ते सत्कार

भेंडा : हरियाणा येथे आयोजिलेल्या राष्ट्रीय कबड्डी चॅम्पियनशीप स्पर्धे तील उपविजेता महाराष्ट्र संघ ठरला. या संघात भेंडा येथील शंकर भीमराज गदाई व राहुल आबासाहेब खाटिक या खेळाडूंचा आमदार शंकरराव गडाख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र संघाचा कर्णधार शंकर गदाई व खेळाडू राहुल खाटिक यांचे बुधवारी (दि.२७) भेंडा येथे आगमन झाले. त्यांचे आतषबाजी करून स्वागत करण्यात आले. यावेळी बसस्थानक चौक ते नागेबाबा मंदिर, भेंडा खुर्द गावापर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. नागेबाबा मंदिरात आमदार गडाख यांनी या दोन्ही खेळाडूंचा सत्कार केला. यावेळी प्रा. दत्ता वाकचौरे, डॉ. शिवाजीराव शिंदे, रवींद्र नवले, सुखदेव फुलारी, बाळासाहेब नवले, भाऊसाहेब गदाई, सोपान महापूर, राजेंद्र वाघडकर, बाबा गव्हाणे, रघू मोरकर आदी उपस्थित होते.

पुढच्यावेळी महाराष्ट्राला 'विजयश्री' खेचून आणणार–कर्णधार–शंकर गदई

नेवाशाच्या शिरपेचात संघाने रोवला मानाचा तुरा.. पो.नि.विजय करे यांचे गौरोद्गार

नेवासा येथे सत्कार समारंभात गदईचे प्रतिपादन...

मोहन गायकवाड / नेवासा (तालुका प्रतिनिधी) –चरखी (हरियाणा) येथे (दि.२१ ते २४) जुलै दरम्यान ६९ व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाला उपविजेतेपद मिळालेले आहे या संघाचे कर्णधार नुकत्याच झालेल्या स्पर्धा संपवून आले असता नेवासा येथे सत्कार आयोजित करण्यात आला.

राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पहिल्यांदाच विजेतेपद मिळविणाऱ्या अहमदनगर संघाचे नेतृत्व करणाऱ्या भेंडे (ता.नेवासा) जिजामाता विद्यालयाचा विद्यार्थी शंकर गदईची पहिल्याच वर्षी महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली शंकर गदई व टिमने उपविजेते पद मिळविल्याने खेळाडूंचा सत्कार बुधवार (दि.२७) रोजी नेवासा येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नेवासा तहसिलदार रुपेशकुमार सुराणा,पोलिस निरिक्षक विजय करे,जेष्ठनेते संभाजी (काका) पवार,पत्रकार राजेंद्र बाधमारे,शंकर नाबदे,मुकिंदपूरचे सरपंच सतिश निपुंगे,प्रा.बी. जे.टेमक,प्रा.रामकृष्ण माकोणे,प्रा.अशोक एरंडे,ॲड वैभव वाकचौरे,ॲड.प्रशांत माकोणे,ॲड.प्रदिप वाखुरे,सुहास टेमक,राहूल सुर्ववंशी,विवेक नऱ्हरे,नगरसेवक जितेंद्र कुऱ्हे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.यावेळी

> प्रा.दत्ताभय वाकचौरे यांनी संघाची विशेष देखभाल व काळजी घेतल्याने आम्हा खेळाडूंना मोठी उर्जा मिळाल्याचे यावेळी कर्णधार शंकर गदई व राहूल खाटीक यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

बोलतांना पोलिस निरिक्षक करे म्हणाले की,राज्य कबड्डी संघाचे नेतृत्व ग्रामिण भागातील शंकर गदई व राहूल खाटीक या दोन खेळाडूंनी केल्याचा सार्थ अभिमान संपुर्ण तालुकावासियांना असल्याचे गौरोद्गारही यावेळी काढले व त्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक केले.

यावेळी सत्काराला उत्तर देतांना कर्णधार शंकर गदई यावेळी म्हणाला की,आमचा संघ हा ग्रामिण भागातील असल्यामुळे जो,तो

संघ आम्हाला हरविण्याच्या अविर्भावात वागत होतो मात्र आमचे ध्येय अंतिम फायनलचे न ठेवता आलेल्या संधाला चितपट करण्याचे ठरवून आम्ही यशस्वी लढा दिला आणि ग्रामिण भागातील खेळाडूही काही कमी नसतात हे दाखवून दिले पुढच्या वेळी महाराष्ट्राला नक्कीच विजयश्री खेचून आणू असा आशावादही यावेळी कर्णधार शंकर गदई व राहूल खाटीक यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्राच्या पुरुष संघाला उपविजेतेपद

हरियाणा : येथे झालेल्या ६९ व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत झुंजार खेळ करुन महाराष्ट्राच्या पुरुष संघाला उपविजेतेपद मिळाले. सर्व खेळाडुंचे मुंबई येथे आगमन झाल्यावर विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या निवासस्थानी खेळाडुंचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले.

यावेळी अजित पवार यांनी खेळाडुंना शुभेच्छा देताना म्हणाले की महाराष्ट्राच्या कबड्डी खेळाला समृध्द वारसा,गौरवशाली परंपरा आहे. ही गौरवशाली परंपरा पुढे नेण्याचे काम राज्यातल्या आजी-माजी कबड्डी खेळाडुंनी,क्रीडा कार्यकर्त्यांनी निष्ठेने केले आहे , महाराष्ट्राच्या मातीतील या रांगड्या खेळाला आणखी उंचीवर नेण्यासाठी आपन सर्वांनी एकत्रित प्रयत्न करुया. सर्व खेळाडु,प्रशिक्षक व व्यवस्थापक यांना बाबुराव चांदेरे सोशल फाऊंडेशन तर्फे अजित पवार यांच्या शुभहस्ते घड्याळ भेट देण्यात आले. याप्रसंगी आमदार भाई जगताप, सरकार्यवाहक - आस्वाद पाटील, बाबुराव चांदेरे ,सचिन भोसले,जे.जे.पाटील, रविंद्र देसाई,अविनाश सोलवट, दत्तात्रय झिंजुर्डे आदि मान्यवर उपस्थित होते.

'कबड्डीपटूंच्या नोकऱ्यांसाठी प्रयत्न करू'

उपविजेत्या महाराष्ट्र कबड्डी संघाचे मुंबईत जोरदार स्वागत

देहूरोड : राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पाच टक्के आरक्षणाच्या माध्यमातून नोकरी देण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन राज्याचे विरोधी पक्षनेते व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांनी बुधवारी दिले.

हरियाणातील चरखी-दादरी येथे झालेल्या ६९ व्या वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राला उपविजेतेपद मिळवून देणाऱ्या पुरुषांच्या कबड्डी संघाच्या खेळाडूंचे अजित पवार यांच्या मुंबईतील निवासस्थानी जोरदार स्वागत झाले. सर्व खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांना बाबूराव चांदेरे सोशल फाऊंडेशनतर्फे अजित पवार यांच्या हस्ते घड्याळ भेट देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष भाई जगताप, सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील, सदस्य बाबूराव चांदेरे, संयुक्त कार्यवाह रवींद्र देसाई, पंच मंडळाचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच दशा शिंदुई, राष्ट्रीय खेळाडू संजय पोकळे, जे. जे. पाटील, मुख्याधिकारी सचिन पोसले, अभिनव सोलव्हट आदी मान्यवर उपस्थित होते.

अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या संघाला जेतेपदासाठी रेल्वे संघाशी झुंज द्यावी लागली होती. मात्र, महाराष्ट्र संघाला २१-३८ अशा गुणफरकाने पराभव पत्करावा लागला होता. या सामन्यात प्रमुख्याने आकाश शिंदे व अस्लम इनामदार यांनी चमकदार कामगिरी केली आणि त्यांना साजेशी साथ संघाचा कर्णधार शंकर गदई व किरण मगर यांनी दिली. शिवाय, महाराष्ट्राच्या संघाने उपांत्य फेरीच्या सामन्यात बलाढ्य असा यजमान हरियाणा संघाला नामोहरम करीत कबड्डीप्रेमकांची मने जिंकली होती.

PRABHAAT | Press Registration No. 1639/1957, Year 91, Issue No. : 207

प्रभात

प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net

पुढच्या वेळी 'विजयश्री' खेचून आणणार : कर्णधार शंकर गदई

नेवासा, दि. २७ (प्रतिनिधी) - स्पर्धेत आमचे ध्येय अंतिम फायनलचे न ठेवता आलेल्या संधाला चितपट करण्याचे ठरवून आम्ही यशस्वी लढा दिला आणि ग्रामीण भागातील खेळाडूही काही कमी नसतात हे दाखवून दिले. पुढील वेळी महाराष्ट्राला नक्कीच विजयश्री खेचून आणू, असा आशावाद कर्णधार शंकर गदई व राहुल खाटिक यांनी व्यक्त केला.

चरखी (हरियाणा) येथे दि. २१ ते २४ जुलैदरम्यान आयोजित ६९व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या संधाला उपविजेतेपद मिळाले. संधाचे नेतृत्व करणाऱ्या भेंडे (ता. नेवासा) जिजामाता विद्यालयाचा विद्यार्थी शंकर गदईची पहिल्याच वर्षी महाराष्ट्र संधाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. गदई व टिमने उपविजेतेपद मिळविल्याने खेळाडूंचा आज (बुधवार) नेवासा येथे सत्कार करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पोलिस निरीक्षक विजय करे, संभाजी पवार, पत्रकार राजेंद्र वाघमारे, शंकर नाबदे, सतीश निपुंगे, प्रा. बी. जे. टेमक, प्रा. रामकृष्ण माकोणे, प्रा. अशोक एरंडे आदी उपस्थित होते.

या वेळी निरीक्षक करे यांनी राज्य कबड्डी संधाचे नेतृत्व ग्रामीण भागातील शंकर गदई व राहुल खाटिक या दोन खेळाडूंनी केल्याचा सार्थ अभिमान तालुकावासीयांना असल्याचे गौरवोद्गार या वेळी काढले.

कर्णधार गदई म्हणाला की, आमचा संघ हा ग्रामीण भागातील असल्यामुळे जो तो संघ आम्हाला हरविण्याच्या अविर्भावात वागत होता. मात्र, आम्ही यशस्वी लढा दिला. प्रा. दत्तात्रय वाकचौरे यांनी संधाची विशेष देखभाल व काळजी घेतल्याने खेळाडूंना मोठी ऊर्जा मिळाल्याचे या वेळी गदई व खाटिक यांनी सांगितले.

पुण्य नगरी

भेंडयात राष्ट्रीय कबड्डी स्पर्धच्या उपविजेता खेळाडूंचा सत्कार

भेंडा : ६९ व्या पुरूषाच्या वरिष्ठ राष्ट्रीय कबड्डी चॅम्पीयन स्पर्धा चरखी, दादरी (हरियाणा) येथे नुकत्याच पार पडल्या. त्यात म्हाराष्ट्र संघ व भारतीय रेल्वे संघ यांच्यात लढत होऊन भारतीय रेल्वे संघाने विजेते पद पटकावले असून महाराष्ट्रच्या संघाला उपविजेते पद मिळाले आहे. त्यात महाराष्ट्र संघाचे कर्णधार येथील श्री मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता महाविद्यालयाचा खेळाडू शंकर भिमराज गदाई व राहुल आबासाहेब खाटिक यांचा समावेश होता. त्यांचे नुकतेच भेंडयात आगमन झाले. त्यावेळी त्यांचे फटाक्याच्या आतषबाजीत जल्लोषात स्वागत करून भेंडा बुद्रुक बसस्थानक चौक ते नागेबाबा मंदिर, भेंडा खुर्द पर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती.

